Vertical Property Rules बाबत समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.८२१/भूमापन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ जुलै, २०२६.

संदर्भ : महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.८२१/भूमापन, दि.३१.१०.२०२५.

प्रस्तावना:-

राज्यात सद्यस्थितीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १४९ ते १५१ मधील तरतुदीनुसार मिळकत पत्रिकेवर मिळकत धारकांचे हक्काबाबत नोंदी घेण्यात येतात. याबाबतच्या अधिनियमान्वये तयार झालेल्या/ तयार होणाऱ्या अपार्टमेंटच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्यामध्ये एकवाक्यता नसते.

बहुमजली इमारतींच्या सहकारी संस्था व त्यामधील सभासदांच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्याबाबत तसेच अपार्टमेंट ॲक्टनुसार सदनिकांच्या नोंदी घेण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे आणि सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारस करण्यासाठी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

बहुमजली इमारतींच्या सहकारी संस्था व त्यामधील सभासदांच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्याबाबत तसेच अपार्टमेंट ॲक्टनुसार सदनिकांच्या नोंदी घेण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे आणि सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णयाव्दारे अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे आणि सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्यासाठी प्रारूप नियम तयार केले आहेत. सदर प्रारूप अंतिम करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पद
१	जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.	अध्यक्ष
२	नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
३	सहकार आयुक्त, पुणे.	सदस्य
४	संचालक, नगररचना, पुणे	सदस्य
५	उप संचालक, भूमि अभिलेख (नागरी भूमापन), संलग्न जमाबंदी आयुक्त, पुणे.	सदस्य सचिव

२. सदर समितीने बहुमजली इमारतींच्या सहकारी संस्था व त्यामधील सभासदांच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्याबाबत तसेच अपार्टमेंट ॲक्टनुसार सदनिकांच्या नोंदी घेण्यासाठी Vertical Property Rules तयार करण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रारूप नियमांचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करावा.

३. सदर समितीने आपला अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा. समितीचे अध्यक्ष जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विशेष निमंत्रित म्हणून त्यांना योग्य वाटेल असे जिल्हाधिकारी किंवा अन्य तज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६०७१५१९०८०६४६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.15 20:14:45 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
६. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक.
८. अपर मुख्य सचिव (नगरविकास) यांचे स्वीय सहायक.
९. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक.

१०. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.सहकार आयुक्त, पुणे.
१३.संचालक, नगररचना, पुणे.
१४.निवडनस्ती/भूमापन.